
अनुभवांचा संगम
शिखर कळसुबाई
चंद्रशेखर सावंत
जाणता राजा

**या मित्रांनो! सुंदर पुस्तकांचा मनमुराद आनंद लुटा!!**

# अनुभवांचा संगम- कळसुबाई शिखर

## हे पुस्तक फुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख. आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो. मजा येते.

## पण तुम्ही ते फुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

### आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या. लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या. मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# अनुभवांचा संगम- कळसुबाई शिखर

(प्रवासवर्णन)

लेखक : चंद्रशेखर नम्रता नथुराम सावंत

# अनुभवांचा संगम- कळसुबाई शिखर

## लेखक - चंद्रशेखर नम्रता नथुराम सावंत

फोन नंबर - +९१ ९९३० ५६ ०४५८

ब्लॉग: cnsawant.blogspot.com

ई-मेल: shekharsawant1111@gmail.com

पत्ता - शिवकोकण-ऐक्यवर्धक सहकारी गृहनिर्माण संस्था,ए-१, ए-९०२, ९ वा मजला, पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या जवळ,शांताराम तलाव, मालाड (पूर्व), मुंबई : ४०० ०९७

**या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.**

**This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.**

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ९ फ़ेब्रुवारी २०२१

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# चंद्रशेखर नम्रता नथुराम सावंत



टोपण नाव : शेखर किंवा विकी

गाव : मु.पो. नांदवी, जिल्हा: रायगड - ४०२ १०३

पत्ता: शिवकोकण-ऐक्यवर्धक सहकारी गृहनिर्माण संस्था, ए-१, ए-९०२, ९ वा मजला, पश्चिम द्रुतगती महामार्गाच्या जवळ, शांताराम तलाव,
मालाड (पूर्व), मुंबई : ४०० ०९७

भ्रमणध्वनी: +९१ ९९३० ५६ ०४५८

ब्लॉग: cnsawant.blogspot.com

ई-मेल: shekharsawant1111@gmail.com

छंद: ट्रेकिंग, ट्रॅव्हल आणि लिखाण

## !!आभार!!

सर्वप्रथम ‘ई-साहित्य प्रतिष्ठान’ या संपूर्ण समूहाचे मनापासून आभार मानतो. त्यांनी मराठी लेखक व वाचक यांना त्यांची असलेली वाचनाची व लिखाणाची आवड वृद्धिंगत होत जावी यासाठी तसेच आजकालच्या इंटरनेट च्या युगात ई-पुस्तकस्वरूपात पुस्तके निर्माण करण्याचे फार मोलाचे व मोठे सत्कार्य त्यांच्याकडून सुरु आहे. याचा मला फार आनंद वाटतो व मनापासून अभिमान आहे.

ई-साहित्य प्रतिष्ठान च्या संकेतस्थळावर माझे किल्ले सोंडाई, किल्ले कर्नाळा व किल्ले कोथळीगड हे ई-पुस्तके प्रकाशित झाली, याचा मला फार आनंद आहे. महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर असणाऱ्या तसेच महाराष्ट्रातील एव्हरेस्ट म्हणून ओळखल्या जाणाऱ्या

कळसुबाई शिखरांविषयायी माझं प्रवासवर्णन मी तुमच्याशी या ई-पुस्तकातून मांडतो. आशा बाळगतो की फार आनंदाने याचे स्वीकार कराल. तत्पूर्वी मी केलेल्या गडांवर गिर्यारोहणाचे अनुभवाचे लेखन, मी माझ्या ब्लॉग वर केले आहे.   ई-साहित्य प्रतिष्ठान मुळे मी दुर्गदर्शन किंवा दुर्ग दुर्घट भारी या विषयाशी जोडला गेलो.

संपूर्ण ई-साहित्य प्रतिष्ठान चे मन:पासून आभार व असंख्य शुभेच्छा.

*आपलाच,*

*--/ चंद्रशेखर सावंत*

*मालाड, मुंबई : ४०० ०९७*

# अर्पण पत्रिका

निर्विवाद सिंहपुरूष व ज्यांचे नाव कानावर येताच
छाती अभिमानाने फुलवणाऱ्या
हिंदवी स्वराज्य संस्थापक
छत्रपती शिवाजी महाराज
यांच्या चरणी कृतज्ञतापुर्वक अर्पण.

--/ चंद्रशेखर सावंत

## अनुभवांचा संगम

# कळसुबाई शिखर

चंद्रशेखर नम्रता नथुराम सावंत

माझ्या आयुष्यातलं आत्तापर्यंत सर्वात मोठं दुर्भाग्य म्हणजे २०२० साली गिर्यारोहण मध्ये कुठच्याही श्रेणी साठी माझ्या पाऊलवाटा वळल्याच नाहीत..ह्याला कारणही तसेच आहे. मार्च पासून आलेला कोविड १९ चा प्रादुर्भाव, पण मी विचार केलाच २०२१ मध्ये काहीही झालं तरी नवीन वर्षाच्या पहिल्या आठवड्यात आपण गिर्यारोहणासाठी निघायचचं! माझा स्वतःसाठी असलेला वेळ हा का म्हणून मी इतर कोणासाठी देऊ? असे विचार चालू असताना, मी राहत्या घरी रात्री जेवण झाल्यावर फेरफटका मारत होतो व इतक्यात माझ्या मजल्यावरील मनोज मला बोलला की शेखर चल कळसूबाई साठी निघू.. माझा एक मित्र आहे तू पण चल.. मग हा विषय निघालाच आहे तर अजून इतर सवंगड्यांच्या कानावर टाकले, त्यात ललित बोलला की शेखर असेल, तर मी येईन.. ललितला खरंतर रात्रीच्या प्रवासाची आणि थंडीची खूप चिंता वाटत होती. त्याला आम्ही सर्व सकारात्मक विचार देऊन शेवटी तो झाला तयार व त्यात माझा मित्र विनायक हा सुद्धा तयार झाला, विनायक

तयार झाला तर प्रश्न पडला अजून एका बाईकचा मग अजून एका मित्राची बाईक मागवून आम्ही गिर्यारोहणासाठी तयार ६ जणं व ३ बाईकद्वारे शुक्रवारी ०९/०१/२०२१ रोजी  रात्री 'हॉटेल फाऊंटन' येथून निघालो. ठीक रात्रीचे १२.०० वाजलेले

व शनिवारचा दिवस चालू झालेला. ललित व मी एकाच बाईक वर असल्याने ठाणे येथून सुरुवात होणाऱ्या नाशिक महामार्ग पर्यंत आमच्या गोष्टी चालूच होत्या, पुढे हळू हळू मार्गस्थ होताच आम्ही २.००/०२.१५ च्या आसपास कसारा घाटाच्या सुरवातीस आमचं चहासाठी थांबण्याचे ठरले, पण चहाचा आस्वाद घेता घेताच आम्हाला मस्त गरमा-गरम कांदाभजी खायची इच्छा झाली व कांदाभजीची प्लेट येताच झणझणीत तिखट चटणी बरोबर ४ प्लेट्स कशा संपल्या हे आम्हाला कळलेच नाहीत व नंतर येणारा चहाचा आस्वाद हा सुद्धा अप्रतिम होता. थोडा तिथे थांबा घेऊन आम्ही पुढे कसारा घाट चढण्यासाठी सज्ज झालो. कसारा

घाटाची असणारी रात्रीची सुंदरता विलोभनीय होती. पण एक विचित्र म्हणजे कसारा घाटामध्येच असताना आमच्या बाईक समोर एक २२-२३ वर्षाचा माथाडी कामगार असलेल्या व्यक्तीसारखा मुलगा अचानक समोर आला व मी बाचकलो व लालितला आवाज दिला की हा बघ.. पण अश्या वेळेला थांबायचे नाही हा सल्ला ललित ने दिला. चोर किंवा लुटारू ती व्यक्ती असू शकते. म्हणून अश्या वेळेला थांबणे चुकीचे ठरेल, म्हणून त्याला दाद न देता आम्ही पुढच्या प्रवासाला मार्गस्थ झालो. पुढे मार्गस्थ होत असताना नाशिकचा टोल आल्यानंतर तिथे बाजूलाच एक शेकोटी करत असलेला व्यक्ती दिसला आम्ही विचार केला थोडी ५ मिनिटं मागे-पुढे झाली तरी चालतील पण शेकोटी घेऊनच निघुया. तिथे पोहोचेपर्यंत मी स्वेटर घातला नव्हता पण शेकोटी घेतल्यानंतर कडाक्याची थंडी वाटू लागली. तिथे थोडा वेळ थांबून नंतर आम्ही ३ च्या आसपास घोटी - शिर्डी मार्गाच्या वळणावर पोहोचलो. तिथे ५ मिनिटं वेळ घेतला व पुढे पुढच्या प्रवासास सुरुवात केला. पुढे

इगतपुरी ला असलेल्या दारणा नदीच्या पुलाच्या पुढे दुर्दैवाने आम्ही रस्ता चुकलो. पाऊस सुद्धा पडत होता त्यामुळे पावसाळयात आलो आहे की काय असं भासत होतं पण जो काही आमच्या साठी अनुभव होता तो भन्नाट होता एकदम वाटेतच इतर बाईकस्वार भेटले, त्यांना थांबवून प्रत्यक्षात विचारले की कळसूबाई येथे जाणारा कुठचा रस्ता आहे? त्यांनी सांगितले की तुम्ही खूप पुढे आलात सिन्नर या ठिकाणी जाणाऱ्या रस्त्याला तुम्ही आला आहात. त्यांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही मागे फिरलो व Google Maps च्या साहाय्याने आम्ही पुढे मार्गस्थ झालो पण तो रस्ता फार कच्चा होता. पाऊस पडल्यामुळे चिखल झालेला व पूर्णपणे ऑफरोड बाईकींग ची मज्जा येत होती. त्यात ललित चा थोडा अंदाज चुकला म्हणून गाडी थोडी तिरपी झाली व त्यांनी शेखर म्हणून मला आवाज दिला. एक मात्र ह्या सवांगड्याचं विशेष की गाडी त्यांनी खाली टेकवली नाही. मध्यरात्री ३.३० च्या दरम्यान असलेली फक्त एक निमुळती वाट, डांबरीकरण नसलेला मातीचा कच्चा रस्ता, मध्येच मोठे खड्डे व गाडीचा

आवाज सोडला तर आजूबाजूला असलेली भयाण शांतता व शेती असं सर्व मुंबईच्या बाहेर मिळणारं सुख म्हणजे खरोखरचं स्वर्गात असल्याचा भास करू देणारा असतो हे काही हौशी मित्र मैत्रिणींना विशेष सांगायला नको. अर्धा पाऊण तास सतत असाच रस्ता चालू असताना समोरून डाव्या दिशेला जाणारा आम्हाला महिंद्राचा पिकअप येतं असलेला दिसला व आमच्या जीवात जरा जीव आला व आम्ही बाईक वरच बागडून त्याचा आनंद घेऊ लागलो की बाबा आलो एकदाचा चांगल्या रस्त्याला कारण जर का त्या रस्त्यात काय अनर्थ आमच्या सोबत घडलं असतं तर त्याला जबाबदार आम्हीच असतो हे तेवढंच सत्य होतं व त्याला सामोरं जाण्याची जबाबदारी सुद्धा आम्ही स्वीकारली होती. पुढे घोटी-भंडारदरा च्या मार्गावर आम्ही थांबण्याचा निर्णय घेतला कारण पावसाने जरा वेग धरलेला तिथे थोडा वेळ जरा थांबताच डोळ्यावर झपकी येऊ लागली पण काय करणार आत्ता एवढ्या जिद्दीने निघालो आहोत तर काही झालं तरी वर माथ्यापर्यंत जाऊन यायचेच होते. ही उम्मेद घेऊन

थोड्या काही वेळातच आम्ही पुढच्या प्रवासास निघालो. तिथून पुढच्या रस्त्याला मात्र खड्डे खूप होते. एक खड्डा वाचवायला गेलो तर दुसरा खड्डा हा यायचाच. तरी सुद्धा हळू हळू आम्ही पुढे मार्गस्थ झालो. पुढे सुद्धा परत एक चुकी झाली आम्ही इंदोरा या गावी पोहोचलो जिथे आम्हाला नाही पोहोचायला पाहिजे होतं. त्या गावात आत गेल्यानंतर गावकऱ्यांचे भजन चालू होतं आम्ही पुढे तिथे थांबलो पण मनोज एका आजोबांना भजनातून घेऊन आला. हाहाहा.. हे समोर येणारं चित्र मात्र सकाळ सकाळी मिळालेली ताजेतवानी करणारी गोष्ट होती. त्या आजोबांकडून आम्हाला असं कळालं की तुम्ही बारी या गावी पाहिलं पोहोचा, व तिथून मुख्य सुरुवात करा. हे सर्व मला माहीत होतं पण म्हणतात ना रात्रीच्या प्रवासादरम्यान होणाऱ्या बाबतीत आपण काही नाही करू शकत. असेच काही त्या अनोख्या रात्री घडत होते. परत मागे फिरून आम्ही बारी गावच्या दिशेने मार्गस्थ झालो. बारी या गावी पोहोचायच्या मार्गावर आम्हाला वाटेत जलद गतीने वाट ओलांडताना ससा दिसला.

थोडक्यासाठी आम्ही तिथे बाचकलो, कारण ऐकून होतो जिथे ससा दिसतो तिथे आजूबाजूला बिबट्या पण असतो. म्हणून लगेच तिथे न थांबता आम्ही तिथून पुढे निघालो. पुढे थोड्याच अंतरावर बारी या गावी पोहोचताच तिथे वाटेत आम्हाला दोन मुलं दिसली बोलली तुमच्या जेवणा-पाण्याचं कसं काय आम्ही तुम्हाला वरपर्यंत जेवण आणून देऊ व त्यांचं व्हिझिटींग कार्ड माझ्या हातात ठेवलं. पुढे गावात पोहोचताच गाड्या एका घराच्या इथे उभ्या ठेवल्या जिथे ५० रुपये तीन बाईक साठी देण्याचे ठरले. ह्या सर्वांची आवराआवर होताच ललितने पायातले मौजे काढून बाईकच्या इंजिन वर ठेऊन गरम करत बसलेला कारण पावसामुळे ओल्या झालेल्या मौज्यांवर चढाई करणे त्याला सोयीचे नव्हते वाटत. मी बोललो की थोडा वेळ आपण थांबू, आराम करू कारण झोप न झाल्यामुळे पुढचा अंदाज मला चुकीचा वाटत होता पण एकदा समोर कळसुबाई शिखर असल्यावर माझे सवंगडी कसले

ऐकतात, त्यांना तेव्हाच सुरुवात करायची होती व आम्ही ठीक सकाळी ६.१५ वाजता सुरुवात केली.

कळसूबाई हा अकोला तालुक्यातील, अहमदनगर जिल्ह्यातील महाराष्ट्राचा सर्वोच्च शिखर असलेला पर्वत आहे. उत्तरेकडील सह्याद्री पर्वत रांगेतील कळसबाई शिखराची उंची १६४६ मीटर (किंवा ५४०० फूट) एवढी आहे. तर बारी गावातून त्याची उंची ९०० मीटर एवढी आहे. कळसुबाई शिखर हे महाराष्ट्रातील एव्हरेस्ट म्हणून ओळखले जाते. कळसूबाई शिखर अहमदनगर आणि नाशिक जिल्ह्यांच्या सीमेवर वसलेले आहेत. यातील अर्ध्या ऊंची पर्यंत तेथील स्थानिक गावकऱ्यांनी शेती केलेली आहे. काठिण्य कातळटप्प्यांवर लोखंडी शिड्या बसविलेल्या आहेत. त्यामुळे २ ते ३ तासात कळसूबाईचे शिखर सर करणे सहज

शक्य आहे. भंडारदरा धरण येथून कळसुबाई शिखराचे ठिकाण ६ कि.मी वर आहे. तेथे २ दिवस मुक्काम करून कळसूबाई , रंधा धबधबा, कोकणकडा इत्यादी ठिकाणे पाहता येतात.

कळसूबाईचा डोंगर चढायला सुरुवात केल्यावर पहिल्या टप्प्यावर कळसूबाईचे देवीचे नविन मंदिर लागते. ज्या भक्तांना शिखरावर जाणे शक्य होत नाही, त्यांच्या सोईसाठी हे मंदिर बांधलेले आहे. पुढे दुसरी शिडी पार केल्यावर कातळात दोन पावले कोरलेली आहेत, ती कळसूबाईची पावले आहेत अशी श्रध्दा आहे.

शेवटच्या शिडीच्या खाली विहिर व बाजूला एक पत्र्याची शेड आहे. शिखरावर कळसूबाईचे छोटे मंदिर आहे. मंदिरात साधारण ४ माणसे बसू शकतील एवढीच जागा आहे. येथून समोरच खाली भंडारदयाचा अथांग पसरलेला जलाशय लक्ष वेधून घेतो. या शिखरावरून उत्तरेला रामसेज, अचला, अहिवंत, सप्तश्रुंग, मार्कंडा, धोडप, रवळया जवळया, कोळधेर अशी डोंगररांग नजरेस पडते. पूर्वेकडे औंढा, विश्रामगड, अलंग, मदन, कुलंग, माथेरान, हरिश्चंद्रगड लक्ष वेधून घेतात.

निसर्गाने महाराष्ट्राला मुक्त हस्ताने भरभरुन दिलं आहे. पण सर्वाधिक खुणवणारी बाब जर इथली कोणती असेल तर ती म्हणजे अथांग समुद्र किनारा आणि सह्याद्रीच्या दूरवर पसरलेल्या पर्वतरांगा. गेल्या काही वर्षांपासून सह्याद्रीचं नाव, विशेष म्हणजे त्याच्या

भेटीसाठी ट्रेकर्सचा ओघ वाढतोय. पण या सह्याद्रीनं त्याच्या चाहत्यांसाठी आणखीन एका आव्हानासाठी प्रेरीत केलं आहे. कळसूबाई च्या रुपानं, महाराष्ट्रातलं माऊंट एव्हरेस्ट म्हणून ख्याती असणारं हे शिखर निसर्ग प्रेमी, गिर्यारोहकांच्या दृष्टीनं एक पर्वणी म्हणता येईल.

इंदोरे गावातून चोहीकडे आपल्याला आढळतात ते उंचच-उंच डोंगर माळा आणि त्यावर पसरलेली हिरवाई. पावसात तर हे रुप पाहण्यासारखं असतं व स्वर्गाची अनुभूती आपल्याला मिळते. त्यातही हलक्याशा धुक्यांच्या व पावसाळी ढगांचे हलके मुलायम कापसासारखे गोळे, आणि रिमझिम शिडकावा ह्यामुळे परिसर आणखीनच मोहक वाटतो. गडावर चढाई करण्याआधी काही गोष्टी कटाक्षानं पाळाव्यात त्या म्हणजे, पाठीवर ओझं होईल इतकं सामान सोबत ठेवू नये, गावच्या एखाद्या घरात तुम्ही सुपूर्द करुन निश्चिंत मनानं आपल्या

प्रवासासाठी मार्गस्थ होऊ शकतात. चढताना आपल्याला गावकऱ्याची किंवा इतर ट्रेकर्स ची मदत हमखास मिळू शकते, पण त्यांना तशी आगाऊ सूचना देणं गरजेचं ठरतं. दुसरं म्हणजे कळसूबाईची चढाई काहिशी कठीण स्वरुपाची व ५ ते ६ तासांच अंतर पार करायला लावणारी असल्यामुळे तुमच्या सोबत ड्रायफ्रुटस्, बिस्किट्स, लिंबू पाणी किंवा अजून कोणता इतर सुखा खाऊ व १ ते २ लिटर पाण्याची बाटली हे सर्व असू द्यावेत.

चढाई करण्याच्या वेळी, गावकऱ्यांनी केलेली भात, भाज्यांची शेती आपल्या नजरेस पडते, व त्यातुन वाट काढत लाल मातीच्या चिंचोळया रस्त्याहून पायवाट पुढे सरकत जाते, वाटेत चिखल, सरकते दगड किंवा खडतर रस्ता असल्यानं सावधपणे पाऊलं सरकवावी लागतात. साधारणत: एक-दीड तासाची चढाई केल्यावर "कळसूआई" चे नवीन मंदीर आपल्या नजरेस पडतं, ज्यांना उंचीचा टप्पा गाठता येणं शक्य नाही त्यांच्यासाठी हे मंदीर

बांधलं आहे, ३०-४० जण घोळका करुन बसतील इतकी जागा येथे आहे, त्यानंतरचा प्रवास थोडासा खडतर होत जातो तो नागमोडी कपाऱ्यांमुळे, मागे वळून पाहताना केवळ ओबड-धोबड पण हिरवाईनं व्यापून गेलेला डोंगराचा पायथा नजरेस पडतो, चढताना मधुनच सरपटणारे प्राणी, तर वाऱ्याच्या झुळुकांवर डोलणारी फुलझाडे आपलं लक्ष वेधून घेतात.







निसर्गाने पांघरलेली हिरवी शाल व समोर दिसणारे तंबू

अधुन मधून उगवलेल्या गवतावर चालल्यानं काही अंशी तर चढाई पटापट होत राहते; जसजसं पुढे सरकतो तशी तशी हवेच्या वेगाची तीव्रता वाढू लागते, शिखरावर स्थित असलेल्या मंदीरा ठिकाणी तिथे जाण्यासाठी एका लोखंडी शिड्यांवरुन जाण्यासाठी मार्ग आहे, अगदी अलगतरित्या पाऊले टाकत अखेर त्या शिखरापर्यंत आपण येऊन पोहोचतो त्याचप्रमाणे कळसुआईचं दर्शन घडतं, इथुन खाली पहाण्याचा आनंद आणि त्यानंतर मनातील चेतना, सोबत विहंगम दृश्य या सर्व नजाऱ्याचं वर्णन करण्यासाठी कदाचित शब्द ही अपुरे पडतील त्यासाठी हौशी मित्र मैत्रिणींनो तुम्ही तिथे एकदा जा व निसर्गाने दान केलेल्या या अप्रतिम नजारऱ्यासाठी निसर्गाच्या स्वाधीन करून आयुष्याचा आनंद घ्या..



निवांत बसलेल्या गायी


मध्यरात्री ०३.१५ वाजता
अनुभवलेली ऑफरोड बाईकिंग
ची मज्जा


मध्यरात्री ०३.१५ वाजता
अनुभवलेली ऑफरोड बाईकिंग
ची मज्जा

तर माझ्या सवांगड्यांनी सकाळी बारी गावातून सुरुवात केली तेव्हा ठीक ६.१५ वाजलेले हळू हळू आम्हा सर्वांना फार बरे वाटत होते की आम्ही शेवटी पायथ्याशी आलो थोडं चालल्या नंतर धापा टाकायची वेळ आली आणि आम्हाला त्या धापा टाकण्या मध्येच हसायला आलं.. ललित बोलतोय मनोजला नाईट ट्रेक... नाईट ट्रेक विथ बाईकिंग घ्या आत्ता... पण नाही सर्वांनी जिद्द पकडली आणि सर्व म्हणाले काही झालं तरी वर असलेल्या टॉप पॅच ला पोहचायचेच! सुरवातीला सर्वात मोठा पडलेला प्रश्न की आम्ही वर व्यवस्थित पोहोचू की नाही? कारण ड्रायव्हिंग व रस्ता चुकल्यामुळे झालेला त्रास व पूर्ण न झालेली झोप या तीनही बाबींमुळे मनात फार शंका येत होत्या.. तरी आम्ही तिथे न थांबता चढाई श्रेणीसाठी सुरुवात केली. काही टप्पा पर केल्यानंतर आम्हाला दमछाक व्हायला लागले व आम्ही तिथे थोडा थांबा घेतला पण आमचा मित्रपरिवार असल्यामुळे एकमेकांना मानसिक तयारीस भाग पाडून आम्ही पुढच्या प्रवासास निघत होतो. तिथे वर जातानाच काही ठिकाणी दुकाने

दिसतात ह्यातील एक दुकाना मधलाच एक छोटा मुलगा वयाने अंदाजे ९-१० वर्षाचा असेल तो मुलगा वर त्यांच्या दुकानाच्या येथे चॉकलेट्सच्या बरण्या घेऊन जात होता व त्याला मनोज ने विचारले की तुम्ही हे रोज असं करता का? तर मुलगा म्हणाला हप्त्यातून एकदा.. काही ठिकाणी थोडं थांबून निसर्गाच्या सानिध्यात आमचं छायाचित्र काढणं चालूच होतं. थोडं काही अंतर पार केल्यानंतर आजूबाजूला असलेली माकडे यायला लागली. सकाळ सकाळी त्यांना भूक लागली असल्याकारणाने आमच्या खूप जवळ येत होती पण आम्हाला मात्र त्यांची खूप भीती वाटत होती. कारण एक क्षण असा होता की लोखंडी शिड्यांचा असलेला पॅच आम्ही सर करत होतो तितक्यात माकडे बाजूला येऊन आमच्या पाठीवर असलेल्या बॅगकडे त्यांची नजर होती कारण त्यांनी जर का त्या वेळी आमच्या बॅगवर उडी मारली असती तर खूप वाईट वेळ झाली असती ती.. पण नशीब चांगलं होतं म्हणून काय झालं नाही. थोड्या काही अंतरावर गेल्यानंतर आम्हाला तिथे आराम करायला जागा

मिळाली व तिथे लिंबाचा रस विक्री करणारा एक गृहस्थ दिसला. कळसुबाईच्या इतिहासावर माझं आणि मन्याचं बोलणं चालू होतं ते सर्व ऐकताच त्यांनी त्याच्याकडे असलेली माहिती सांगायला सुरुवात केली व मन्याने त्याचं चित्रीकरण केलं. तर माहिती अशी की पूर्वीच्या काळात गावात खूप नुकसान होत असल्यामुळे गावकरी जनावरं चरायला वर घेऊन यायचे, पलीकडे इंदोरा सुद्धा गाव आहे.. तिकडची माणसे सुद्धा जनावरं चरायला वर घेऊन यायची. तर जनावरं चरायला घेऊन आलेला एक व्यक्ती असाच तिथे सहज बसलेला व त्याला अचानक आवाज आला की येऊ का म्हणून.. त्याने एकडे तिकडे बघितलं तर हा आवाज कुठून आला? असा मोठा प्रश्न त्याच्या समोर उभा राहिला. तो घाबरला थोडक्यात.. घाबरल्यानंतर त्यांनी त्याची जनावरं तिथेच टाकून दिली व धावत घरी गेला व त्याने ही गोष्ट त्याच्या घरी आई वडिलांना सांगितली. घाबरल्या नंतर त्याच्या आई- वडिलांना त्याने सोबत घेतलं व अजून गावातल्या इतर माणसांना सोबत घेतलं. वर आल्यानंतर परत त्याला आवाज

आला की मी येऊ का म्हणून? असे झाल्यानंतर त्याला कळाले की हा देवीचाच रूप आहे व इतर माणसे सुद्धा बोलली की ये म्हणून पण आल्यानंतर गावकऱ्यांनी विचारलं तुझं नाव गाव काय? तर म्हणाली मला नाव-गाव काहीच माहिती नाही तर गावकरी बोलले की चल घरी.. पण घरी यायचं म्हटलं तर माझ्या पण २ अटी आहेत एक म्हणजे खरकटी भांडी उचलायचे नाहीत आणि दुसरं म्हणजे माझं काय लग्न वैगरे करायचं नाही, तर काही वर्षांनी ती मुलगी सुद्धा मोठी होत गेली आत्ता मोठी झाल्यानंतर लग्न तर करावेच लागेल या निमित्ताने घरच्यांनी तिच्या लग्नासाठी पाहुणे बोलवलेले, पाहुणे वैगरे आल्यानंतर कार्यक्रम सुरू झाला.. त्यामुलीचं टोपण नाव होतं 'कळशी' तर घरातले तिला म्हणायला लागले. कळशी हे जरा भांड उचल.. तर, कळशी ने नकार दिला.. परत घरच्यांनी सांगितलं कळशी जरा हे भांड उचल तर कळशी ने रागात नकार दिला व परत बोलली नाही.. तिने तर पहिल्यांदाच अट घातलेली की खरकटी भांडी व लग्न करायचे नाही पण ते काय घरच्यांच्या

लक्षात राहिलेले नाही. पण रागाच्या भरात ती म्हणाली आत्ता एवढं बोलत आहात तर उचलुच का?? तर घरातले म्हणाले हो उचल.. तिथे पाहुण्यांना बसायचे आहे. त्यावेळी तिने ती भांडी उचलली आणि रागाच्या भरात अंगणाच्या बाहेर आणून ठेवली व तिथून ती रागाच्या भरात निघाली. तिथेच एक इंदोरा म्हणून गाव आहे. तिथे तिने थोडी विश्रांती केली व तिथून पायथ्याशी एक मंदिर लागतं त्या ठिकाणी ती थांबली तिथून ती थेट वर जाऊन बसली व अनोख्या प्रकारचे आसन तिने तिथे बनवून ठेवले व काही वेळानी घरच्यांनाच साक्षात्कार होताच कळाले की इथेच तिची स्थापना आहे. तेव्हा त्यांना कळले की ही तर देवी होती त्यानंतर मग तिथे त्या ठिकाणी देवीची पुजा इत्यादी ह्या सर्व विधी चालू राहिल्या अशी माहिती आम्हाला गडावरील लिंबू पाणी व पाण्याच्या बाटल्या विक्री करणारे एक तरुण व्यक्तिमत्त्व 'देविदास खाडे' यांनी सांगितली. हे सर्व त्याच्याकडून ऐकल्यानंतर त्याचे मनापासून आभार मानून आम्ही पुढच्या दिशेला प्रवास केला थोड्याच काही अंतरावर

आम्हाला एक उजव्या दिशेला विहीर दिसली.. ह्या विहिरीचे असलेले थंड पाणी म्हणजे आहाहा.. सर्व थकवा घालवणारी त्या विहिरीच्या इथे पोहोचल्यावरच आम्हाला वरचा शेवटच्या पॅच दिसू लागला व आनंद गगनात मावेनासा झाला व आम्ही कधी शेवटच्या पॅचला पोहोचतोय याची मनात उत्कंठता वाढू लागली व काही मिनिटातच आम्ही शेवटच्या पॅचवर पोहोचलो व २०२१ च्या पहिल्या आठवड्यात महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर म्हणून ओळखले जाणारे कळसूबाई शिखर येथे पोहोचलो याचा आनंद गगनात न मावेनासा झाला.. पहिलं वर पोहोचल्यानंतर कळसुआईचे दर्शन घेतले व पुढे येऊन थोडी विश्रांती केली. थोड्या वेळात नाश्ता पाणी करून निसर्गाच्या सानिध्यात छायाचित्रीकरण करण्यास सुरुवात केली..

**सूर्योदयाच्या वेळी मनमोहून टाकणारे विहंग दृश्य निसर्गाच्या प्रेमात पाडते.**





कळसुबाई शिखराच्या शेवटच्या टप्प्यावर मनोजने खास मुंबईहून आणलेला झेंडा फडकवला

मन्याने तर खास मुंबईहून छत्रपती शिवरायांचा झेंडा आणलेला, तो झेंडा बघूनच मनात सारखा सारखा अभिमान जागून उठून येत होता की आम्ही छत्रपती शिवरायांच्या भूमी मधील आहोत म्हणून. आम्ही साधारण १२.१५ च्या आसपास परतीच्या प्रवासास सुरुवात केली व दुपारी ०१.२० च्या आसपास तळपायाशी येऊन पोहोचलो. तळाच्या येथे पोहोचल्यावर सुद्धा तुम्हाला कळसुआई चे मंदिर लागते.. ज्यांना वर जायचे नसेल असे व्यक्ती खालूनच देवीचे दर्शन घेऊ शकतात. जिथे गाड्या उभ्या केलेल्या त्या ठिकाणी पोहोचल्यावर तिथे ५ मिनिटात तयार होऊन आम्ही परतीच्या मुंबई साठी मार्गस्थ झालो पण लागलेली खूप भूक मग खाणार काय असा मोठा प्रश्न म्हणून घोटी नाशिक असलेल्या महामार्गावर आम्ही जेवणासाठी बसलो. मसाला पापड, बटर रोटी, पनीर कोल्हापुरी, जीरा राईस, दाल तडका व त्याच जोडीला असलेल्या सेव्हनअप्स च्या बाटल्या हे सर्व झाल्यानंतर आम्ही ४.३० च्या आसपास तिथून निघालो पण एक प्रश्न मात्र मोठा सतावत होता की गाडीवर असताना झोप

नको यायला आणि शेवटी पुढे तेच झालं.. कसारा घाट चालू झाल्यानंतर एक झपकी लागली हे मी वेळीच ओळखले व ललितला बोललो ललित थोडं थांबुयात तिथे उतरून एका हॉटेलच्या ठिकाणी डोळ्यावर थंड पाणी मारून घेतले व परत पुढच्या प्रवासास निघालो परत पुढे ठाण्याला आल्यावर सुद्धा असेच झाले म्हणून वाटेत गाडी थांबवून परत चेहऱ्यावर थंड पाणी मारून घेतले व पुढे मुलुंड पवई मार्गे येत आरे कॉलनी मधून निघत आम्ही शेवटी मालाडला राहत्या घरी फोहचलो.. या प्रवासादरम्यान असलेले माझे साथीदार मनोज, ललित, विनायक, विश्वास आणि चेतू यांचा फार मी ऋणी आहे.


पाठीशी कळसुआईचा आशिर्वाद
आणि चेहऱ्यावर सुखद आनंद
जगायला अजून काय लागतं!



संध्याकाळच्या वेळी परतीच्या प्रवासादरम्यान महामार्गावरून दिसलेला सूर्यास्त!



अस्तबिंब!


निसर्गाच्या कुशीतली सुखनिद्रा.
मनोजने टिपलेली माझी सुखमुद्रा


आनंदाचा मार्ग



महाराष्ट्राच्या टॉपवर

## कळसुबाई शिखर येथे अंतिम टप्प्यावर पोहोचल्यानंतर

## निसर्गाच्या कुशीत व खुशीत...





आमची धडाकेबाज ट्रेकटीम
डावीकडून मनोज, ललित, चेतन,
मी(शेखर), विश्वास, विनायक

बारी या गावी वाहनी मार्गाच्या येथे असलेले फलक



राहण्याची सोय : शिखरावर रहाण्याची सोय नाही. भंडारदऱ्याला राहण्याची सोय होऊ शकते.

जेवणाची सोय :बारी गावात किंवा भंडारदऱ्याला जेवणाची सोय होते.


पाण्याची सोय :शिखरावर जाताना शेवटच्या टप्प्यावर शिडीच्या अगोदर एक विहीर आहे. वाटेत पाणी मिळत नसल्याने बारी गावातच पाणी भरून घ्यावे.


जाण्यासाठी लागणारा वेळ :बारी गावातून २-३ तास लागतात.


ऋण निर्देश : TrikShitiz Sanstha, Google Maps.

चालू झालेल्या २०२१ या नवीन वर्षी पहिल्याच आठवड्यात निसर्गात जाण्याचा योग, तोही महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर म्हणून प्रख्यात असणाऱ्या ‘कळसुबाई शिखर’ येथे आल्यामुळे अंतिम टप्प्यावर पोहोचल्यानंतर निसर्गाला पाहताना एक मिळाले मानसिक समाधान. धन्यवाद!

चंद्रशेखर सावंत यांची इतर पुस्तके. खालील कव्हरवर फ़क्त एक क्लिक. पुस्तक हजर.



दुर्ग दुर्घट भारी

*आसेतूहिमाचल*

सुंदर हा देश

त्या सुंदर यात्रेसाठी

**कुठे शोधिशी स्वित्झर्लंड अन कुठे शोधिशी काश्मीर?**

www.esahity.com वर महाराष्ट्र, भारत व जग प्रवासाची अतिशय सुंदर प्रवासवर्णनं आहेत. तुमच्याआमच्यासारख्या लोकांनी आपापले प्रवास अनुभव शब्द आणि छायाचित्रांतून मांडले आणि पाठवले. ई साहित्यच्या टीमने त्याची सजावट वगैरे करून त्यांना पुस्तकरूप दिलं. अशी शंभराहून अधिक पुस्तकं आता ई साहित्यवर आहेत. आणि ही संख्या काही हजारांत जाईल याची आम्हाला खात्री आहे. कारण आपण लिहीणार आहात. आपण जिथे जिथे फ़िरायला जाल तिथले फ़ोटो व वर्णनं पाठवा. आपण जिथे रहाता त्या परिसरातील ठिकाणांचे फ़ोटो व माहिती पाठवा. ते प्रसिद्ध पर्यटनस्थळ

असेल वा नसेल. तुम्हाला ते स्थळ आवडलं ना? मग लिहा. पाठवा. अलंकारिक भाषेची चिंता करू नका. बाकी सगळं आम्ही बघून घेऊ.

संपुर्ण जग, संपुर्ण भारत देश, महाराष्ट्रातला प्रत्येक जिल्हा, प्रत्येक तालुका आणि प्रत्येक गाव सुंदर आहे. आणि त्याचं सौंदर्य पाहू शकेल असा कोणीही दिव्यदृष्टीचा पाईक आमच्या या "मी पाहिलेला…" सिरीजमध्ये भाग घेऊ शकतो. याचा फ़ायदा त्या त्या ठिकाणाला भेट देणाऱ्यांना होईल. किंवा परदेशात राहणाऱ्या मराठी वाचकांना त्या जागेला भेट दिल्याचा आनंद मिळेल. किंवा प्रकृती अस्वास्थ्यामुळे फ़िरू न शकणारे जीव त्याचा आनंद घेतील. वाटा. आनंद वाटा. ज्या वाटेवर फिरण्यात तुम्हाला आनंद वाटतो तो वाटेचा आनंद वाटेल तेव्हा वाटत रहा.

**सौंदर्याचे निधान आहे तुझ्या गावच्या वेशी!**

आपल्या लेखनाची मेल व foto पाठवा.

esahity@gmail.com